**श्री गणेशाय नमः**
**श्री शर्वाणी - वेताळ महारुद्र प्रसन्न**

# राशिभविष्य - २०२२

## जानेवारी

**मेष :** नूतन वर्षाभिनंदन! ग्रहमान तसे अनुकूल आहे. अपेक्षित यश मिळविण्यासाठी प्रयत्नांचा वेग मात्र वाढवावा लागेल. उत्तरार्धात नोकरी-व्यवसायात मनासारख्या घडामोडी घडतील. धनलाभ संभवतो. मन:स्वास्थ्य चांगले राहील.

**वृषभ :** 'आव्हाने स्वीकारा' असे या महिन्याचे सांगणे आहे. थोडी प्रतिकूलता जरूर जाणवेल, मात्र त्यातूनच अनेक सकारात्मक बाबी आकार घेतील. विचार करून कृती करा. मोठे आर्थिक व्यवहार सध्या तरी टाळणे योग्य.

**मिथुन :** दुसऱ्यावर कितपत आणि का अवलंबून राहावयाचे हे ठरवून वागण्याचा काळ आहे. प्राकृतिक स्वास्थ्याचा परिणाम आपल्या कर्तव्यपूर्तीवर होऊ देऊ नका. योग्य पर्याय अवलंबा. उत्तरार्धात कुटुंबामध्ये सुखाचे क्षण अनुभवता येतील.

**कर्क :** महिना आनंददायी व उत्साहवर्धक आहे. सामाजिक कार्यात तुमच्या कार्याची दखल घेतली जाईल. मानसन्मान होईल. उत्तरार्धात काही अप्रिय घटना घडण्याची शक्यता जाणवते. संयम बाळगा. प्रकृतीची काळजी घ्या.

**सिंह :** आप्तस्वकीयांकडून थोडा मानसिक त्रास या महिन्यात होणार असे दिसते. तुमच्या वागण्या-बोलण्याने गैरसमज होणार नाहीत याची खबरदारी बाळगा. आर्थिक पातळीवर थोडे चढ-उतार जाणवतील. प्रकृती सांभाळा.

**कन्या :** दुसऱ्यांच्या आश्वासनांवर विसंबून महत्त्वाचे निर्णय घेऊ नका. आहारविहारावर नियंत्रण ठेवा. घरातील वातावरण आनंदी कसे राहील याकडे लक्ष द्या. अनावश्यक खर्च कमी केल्याने आर्थिकदृष्ट्या अपेक्षित परिणाम मिळेल

**तूळ :** वर्षाची सुरुवात छान आहे. प्रिय मित्रमंडळींच्या गाठीभेटी झाल्याने वातावरण आनंदी असेल. कार्यक्षेत्रात तुमच्या कर्तृत्वाला वाव मिळेल. नुकत्याच झालेल्या ओळखीत आर्थिक व्यवहार टाळा. प्रवासात दक्ष राहून मौल्यवान वस्तू सांभाळा.

**वृश्चिक :** तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव इतरांवर वाढेल. सहवासातील व्यक्तींची अचूक पारख करण्याचे तंत्र विकसित करावे लागेल. उत्तरार्ध अधिक लाभदायक आहे. धनप्राप्तीचे योग संभवतात. आर्थिक समस्यांची तीव्रता कमी होईल.

**धनु :** या महिन्यात तब्येतीच्या तक्रारी जाणवतील. आहाराविहाराकडे लक्ष द्या. सहकार्यांबरोबर झालेले मतभेद युक्तीने दूर करावे लागतील. फसव्या आश्वासनांना बळी पडू नका. अनावश्यक खर्च टाळण्याचा प्रयत्न करा.

**मकर :** वर्षाच्या सुरुवातीस मनाविरुद्ध काही निर्णय घ्यावे लागतील. ईप्सित कार्यभाग साधण्यासाठी तडजोड करणे क्रमप्राप्त आहे. पूर्वार्धात महत्त्वाची कामे हातावेगळी करा. व्यवसाय क्षेत्रात नवीन जबाबदाऱ्या स्वीकाराव्या लागतील.

**कुंभ :** वर्षाचा प्रारंभ अनुकूल वातावरणात होत असला तरी तुम्ही सतर्क राहाणे जरुरीचे आहे. एकाच्या आश्वासनावर दुसऱ्याला शब्द देण्याचे टाळा. खर्च आटोक्यात ठेवा. कार्यक्षेत्रातील विरोधकांना वरचढ होण्याची संधी देऊ नका.

**मीन :** आपले लक्ष आपण उद्दिष्टांवर केंद्रित करणेच योग्य! मानापमानाचे प्रसंग युक्तीने हाताळा. सामाजिक कार्यात प्रतिष्ठेचा प्रश्न करू नका. कुटुंबातील गैरसमज दूर करण्यास प्राधान्य द्या. उत्तरार्धात तुमचे पारडे जड असेल.

# फेब्रुवारी

**मेष :** या महिन्यात तुमचे कर्तृत्व सिद्ध करण्याची संधी मिळेल. वरिष्ठांच्या सहकार्याने प्रगतीचा उल्लेख उंचावता येईल. काहींच्या घरात शुभकार्ये ठरतील. योग्य आर्थिक नियोजनाने अनावश्यक खर्च टाळू शकाल.

**वृषभ :** महिन्याच्या पूर्वार्धात अव्यवहार्य धाडस करू नका. अतिउत्साहाला आवर घाला. मनावर ताबा ठेवणे आवश्यक आहे. सरकारदरबाराची कामे सावधपूर्वक हाताळा. उत्तरार्धात अनुकूलता प्राप्त होईल. प्रयत्नांना यश मिळेल.

**मिथुन :** 'भावनेच्या आहारी जाऊ नका!' असेच या महिन्याचे सांगणे आहे. भावी घडामोडींचा अंदाज घेऊनच आपली रणनीती ठरवा. महत्त्वाच्या निर्णयप्रसंगी सहकाऱ्यांना विश्वासात घ्या. नातेवाइकांत आर्थिक व्यवहार शक्यतो टाळावा.

**कर्क :** मतभेदाने एकाग्रता विचलित होतेच! सध्या आपल्या कार्यावरच लक्ष केंद्रित करा. विरोधक मुद्दामहून काही कळीचे मुद्दे उपस्थित करतील. शांत राहा. आक्रमक भूमिका घेणे टाळा. कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढणार आहेत.

**सिंह :** ग्रहमान अनुकूल आहे. पूर्वार्धात अपेक्षित कामे पार पडतील. नियोजित कामांना गती मिळेल. कौटुंबिक पातळीवर काही समस्या उद्‌भवतील. धैर्याने सामोरे जा, मार्ग सापडतील. आर्थिक आवक चांगली असेल.

**कन्या :** नेमके आपले कोण हे जाणून वागण्या-बोलण्याचा काळ आहे. वादविवादाचे प्रसंग युक्तीने हाताळा. उत्तरार्ध अनुकूल आहे. कार्यक्षेत्रातील नवे विचार प्रगतिकारक ठरतील. व्यवसायामधील गुंतागुंतीचे प्रश्न सुटतील. कौटुंबिक जबाबदारी योग्य रीतीने पार पाडाल.

**तूळ :** आर्थिक क्षमतेचा अंदाज घेऊन व्यवसायवृद्धीचे निर्णय घ्यावे लागतील. इतरांनी दिलेली आश्वासने ते पाळतीलच असे नाही. आर्थिक प्राप्ती चांगली राहील. मित्रमंडळींकडून अपेक्षा नको. विरोधकांवर वचक ठेवण्याचे प्रयत्न सफल होतील.

**वृश्चिक :** या महिन्यात प्रसंगी तुमची सामाजिक प्रतिष्ठा कामी लावावी लागेल. तुमच्या समस्यांचा फायदा उठवला जाणार नाही, याबाबत सतर्क राहा. आपल्या खाजगी बाबींची इतरांबरोबर चर्चा करू नका. प्रत्येक कृती विचारपूर्वक करावी लागेल.

**धनु :** स्वकर्तृत्वाने मिळालेल्या यशाने आत्मविश्वास वाढेल. नुकत्याच संपर्कात आलेल्या व्यक्तीपासून थोडे अंतर ठेवून वागा. सदसद्‌विवेक बुद्धीने निर्णय घ्या. प्रलोभनांपासून लांबच राहा. कौटुंबिक वाद त्वरित मिटवा.

**मकर :** या महिन्यात आर्थिक आवक आणि खर्च याचा ताळमेळ जुळणार नाही. आर्थिक ओढाताण होईल. जागेचा व्यवहार करताना कागदपत्रांची शहानिशा करून घ्या. तुमची विनम्रता तुमच्या पदरी यश देईल.

**कुंभ :** 'भित्यापाठी ब्रह्मराक्षस!' घाबरून मार्ग सापडत नाही आणि प्रश्नही सुटत नाहीत. धैर्याने संकटाला सामोरे जा. यशस्वी व्हाल. प्रतिष्ठित व्यक्तींच्या ओळखी लाभदायक ठरतील. प्रवासात अधिक काळजी घ्या.

**मीन :** पूर्वार्धात रविचे असलेले पाठबळ ही एक तुमची जमेची बाजू. आपले प्रयत्न कमी पडणार नाहीत याची काळजी घ्या. उत्तरार्धात काही अनपेक्षित खर्च संभवतात. प्रवासातील परिचयाला गांभीर्याने घेऊ नका.

# मार्च

**मेष :** महिन्याच्या सुरुवातीस व्यवसाय क्षेत्रात नवीन जबाबदारी स्वीकारावी लागेल. आर्थिक पातळीवर होणाऱ्या उलाढालींवर लक्ष असू द्या. रागावर नियंत्रण ठेवा. व्यवसायातील भागीदारांशी मतभेद टाळणे योग्य. प्रकृतीची काळजी घ्या.

**वृषभ :** या महिन्यात अपेक्षेनुसार गोष्टी घडणार आहेत. कोणत्याही बाबतीत अतिरेक टाळा. मानापमानाचे प्रसंग येतील, संयम बाळगा. कामानिमित्त प्रवास संभवतो. अनावश्यक खर्चाला कात्री लावून बचतीचे प्रमाण वाढवा.

**मिथुन :** कोणाच्याही आश्वासनावर विसंबून राहू नका. उत्तरार्धात कार्यक्षेत्रात तुम्ही स्वत:चे कर्तृत्व दाखवू शकाल. आर्थिक विवंचनेवर कर्ज काढणे हा मार्ग शक्यतो अवलंबू नका. मित्रमंडळींकडून सहकार्य लाभेल.

**कर्क :** विरोधकांचे मुद्दे पटणारे नसले तरी वादविवाद वाढवू नका. थोडे सबुरीने घ्या. कौटुंबिक समस्या समजून घेतल्यास त्यावर मार्ग काढू शकाल. मोठे आर्थिक व्यवहार टाळा. सरकारी नियमांचे उल्लंघन नको.

**सिंह :** हाती घेतलेल्या कार्यात यश मिळण्यास वातावरण अनुकूल आहे. मतभेद टाळून मार्गक्रमण करणे हिताचे ठरेल. घरातील व्यक्तींच्या आजारपणात योग्य काळजी घ्या. समोरच्या व्यक्तीला न दुखावता गोड बोलून कार्यभाग साधा.

**कन्या :** सुरक्षित आर्थिक गुंतवणूक करणे फार महत्त्वाचे. प्रसंगी तज्ज्ञांचा सल्ला घ्या. समाजात मानमरातब वाढेल. तुमच्या शब्दाला मान दिला जाईल. उत्तरार्धात काही अप्रिय घटनांना सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे.

**तूळ :** एखादे आव्हान स्वीकारलेत की त्यातील टक्केटोणपेही सहन करून पुढे जावे लागते, हे जाणून मार्गक्रमण केले तर यश निश्चित पदरी पडेल. उत्तरार्ध अनुकूल आहे. आर्थिक लाभाने कार्यउत्साह वाढेल. विरोधकांच्या कारवाया थंडावतील.

**वृश्चिक :** शत्रूवर मात करणे या महिन्यात सहज शक्य होईल. नेमकी संधी ओळखून आपली पावले उचला. घरातील थोड्याशा अस्थिरतेने परिस्थिती हाताबाहेर जाणार नाही याची दक्षता घ्या. महिलांच्या कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढणार आहेत.

**धनु :** या महिन्यात ग्रहांच्या अनुकूलतेने तुमची यशाची कमान चढती राहील. कार्यक्षेत्रात तुमचे स्थान मजबूत कसे होईल याकडे अधिक लक्ष द्या. उत्तरार्धात प्रवास संभवतो. कायद्याची चौकट मोडू नका.

**मकर :** या महिन्याच्या पूर्वार्धात परिस्थितीनुसार तुम्हाला काही कठोर निर्णय घ्यावे लागतील. स्पर्धात्मक बाबींत विचारपूर्वक भाग घ्या. चहाडखोर व्यक्तींमुळे थोडा मनस्ताप संभवतो. आहाराचे वेळापत्रक काटेकोर पाळा.

**कुंभ :** सध्या आरोग्याबाबत तुम्ही अधिक जागरूक राहिले पाहिजे. राहत्या घराबाबत काही समस्या निर्माण होतील. व्यावसायिकांना आर्थिक धोरणात परिस्थितीनुसार बदल करावा लागेल. दूरचे प्रवास शक्यतो टाळणे योग्य.

**मीन :** काही अनपेक्षित घडामोडींमुळे मनाच्या गोंधळाची स्थिती निर्माण होण्याची शक्यता जाणवते. शांत चित्ताने विचार करून परिस्थितीला सामोरे जा. यशप्राप्ती होईल. उत्तरार्धात पोटाच्या विकारांकडे दुर्लक्ष नको.

# एप्रिल

**मेष :** भावनेच्या आहारी न जाता कर्तव्यपालनाला प्राधान्य द्या. कार्यक्षेत्रातील सहकाऱ्यांना विश्वासात घेऊन निर्णय घेतल्यास गैरसमज टाळू शकाल. हुशारी आणि कल्पकता यांचा मेळ घालून मार्गक्रमण करा. प्रवास संभवतो.

**वृषभ :** थोरामोठ्यांच्या मार्गदर्शनाने वाटचाल करा. प्रगतीतील अडथळे कमी होतील. आर्थिक आवक चांगली असेल. उत्तरार्धात व्यक्तिगत पातळीवर काही तडजोडी कराव्या लागतील. विरोधकांच्या कारवायांकडे दुर्लक्ष नको.

**मिथुन :** तुमच्या अंगी असलेल्या कलाकौशल्याचे वरिष्ठांकडून कौतुक झाल्याने कामातील उत्साह द्विगुणीत होईल. कर्तव्यपालनात प्रकृतीकडे मात्र दुर्लक्ष करू नका. समाजातील नामवंतांचा सहवास लाभल्याने मन प्रसन्न राहील.

**कर्क :** समोरच्या व्यक्तीला शब्द देताना आपल्या क्षमतेचाही विचार करा. आर्थिक घडामोडींवर जरा अधिक बारकाईने लक्ष ठेवा. उत्तरार्ध अनुकूल आहे. रखडलेली कामे मार्गी लागतील. कलाकारांना प्रसिद्धी मिळेल.

**सिंह :** 'प्रयत्नांती परमेश्वर' हे सूत्र बाळगून मार्गक्रमण केले तर यश नक्की पदरी पडेल. सकारात्मक बाबींवर अधिक भर द्या. घरातील एखाद्या व्यक्तीमुळे थोडा मनस्ताप संभवतो. आपल्या मनाप्रमाणे होत नसेल तर त्याकडे दुर्लक्ष करणेच योग्य.

**कन्या :** अडचणी या सर्वांनाच येत असतात. त्यांचा बाऊ न करता त्यातून मार्ग काढणे हे महत्त्वाचे. समोरच्या व्यक्तीला नाराज न करता गोड बोलून कार्यभाग साधा. कुटुंबातील आजारपणाकडे केलेले दुर्लक्ष नंतर महागात पडण्यापेक्षा वेळीच इलाज शोधा.

**तूळ :** हाती घेतलेल्या कार्यात मनाप्रमाणे यश मिळेल. विरोधकांना नमवणे कठीण जाणार नाही. मित्रपरिवारातील मतभेदाकडे दुर्लक्ष करा. कार्यक्षेत्रातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी कार्यपद्धतीत थोडा बदल करावा लागेल.

**वृश्चिक :** तुमच्या बोलण्याचा चुकीचा अर्थ काढून विरोधक त्याचा गैरफायदा घेण्याची शक्यता आहे. शब्द जपून वापरा. संयमाने प्रतिक्रिया द्या. उत्तरार्धात परिस्थितीत अनुकूल बदल होईल. मोठी गुंतवणूक सध्या नको.

**धनु :** एखाद्या अप्रिय घटनेचा परिणाम कार्यतत्परतेवर होणार नाही याची काळजी घ्या. मन:स्वास्थ्य सांभाळा. वरिष्ठांचा विश्वास संपादन करण्याचा प्रयत्न करा. आहारावर नियंत्रण ठेवल्यास तब्येतीच्या तक्रारी कमी होतील. खर्चाचे प्रमाण वाढेल.

**मकर :** छोट्याशा कामाला जास्त वेळ लागला तरी विचलित होऊ नका. या महिन्यात धनप्राप्ती चांगली असली तरी खर्चही वाढणारे आहेत. जमीन-जुमल्याचे व्यवहार पुढे ढकला. मोठे साहस, व्यावसायिक स्पर्धा टाळा.

**कुंभ :** कार्यक्षेत्रातील मनाविरुद्ध घडणाऱ्या बाबींमुळे नाराज न होता आपल्या कामावर लक्ष केंद्रित करा. आपण जरी सत्याने वागत असलो तरी सर्वच तसे नसतात. कौटुंबिक पातळीवर आर्थिक नियोजनाला प्राधान्य दिलेत तर ते भावी समस्या टाळण्यास उपयुक्त ठरेल.

**मीन :** तुमचे म्हणणे समोरची व्यक्ती प्रत्येक वेळी मान्य करेल असे नाही, तिच्याही मताचाही विचार केल्यास वादविवादाचे प्रसंग येणार नाहीत. व्यवहारात मध्यस्थावर अवलंबून राहिल्यास फसगत होईल. कुटुंबासाठी अधिक वेळ द्या.

# मे

**मेष :** आपला आवाका आणि आपली ताकत ओळखून वागण्याचा काळ आहे. वादविवादाचे प्रसंग खुबीने टाळा. अन्यथा नाहक चांगले संबंध बिघडतील. स्वकर्तृत्वावर अधिक भर द्या. उत्तरार्धात तब्येतीकडे अजिबात दुर्लक्ष नको.

**वृषभ :** अनुकूल असलेल्या परिस्थितीचा नेमका फायदा उठविण्याचा काळ आहे. खर्च थोडे वाढतील मात्र ते करावेच लागतील. सामाजिक कार्यातील सहभागाने प्रतिष्ठा वाढेल. प्रवास संभवतो. प्रवासात आहार-विहार सांभाळून करा.

**मिथुन :** सध्या तुम्ही अधिक दक्ष राहणे आणि स्वयंसिद्ध होणे गरजेचे आहे. कुठलाही निर्णय घेताना अतिघाई करू नका. थोडा वेळ मागून घ्या. अन्यथा नुकसान तुमचेच! काही अनपेक्षित खर्च करावे लागतील.

**कर्क :** ग्रहांचे पाठबळ लाभत आहे. धाडस करा आणि पुढे जा. मात्र अति आत्मविश्वास नको. कौटुंबिक वातावरण मनाजोगते राहील. काहींचे शुभकार्याचे योग संभवतात. जमिनीचे व्यवहार मार्गी लागतील.

**सिंह :** असलेल्या प्रतिकूल परिस्थितीचा बाऊ न करता थोडे सकारात्मकतेने वागलात तर काही कठीण होणार नाही. नातेवाइकांत व्यवहार शक्यतो टाळावा. उत्तरार्धात कार्यक्षेत्रात नवीन जबाबदाऱ्या स्वीकाराव्या लागतील.

**कन्या :** आपले म्हणणे मांडताना नेमकी संधी साधलीत तर यश तुमचेच! भांडणे ही होतातच परंतु त्यात कितपत अडकून राहायचे हे ठरवून मार्गक्रमण करा. आपली प्रगती आपल्यालाच साधायची आहे. तब्येत सांभाळा.

**तूळ :** जवळच्यांशी आपले वाद होणार नाहीत हे पाहिलेत तर महिना तसा त्रासदायक नाही. इतरांशी आपली तुलना करणे टाळा. तुम्ही तुमच्या ध्येयावर लक्ष केंद्रित करा. आपले निर्णय आपणच घ्या. प्रवासात खर्चावर नियंत्रण ठेवणे तुमच्याच फायद्याचे ठरेल.

**वृश्चिक :** 'आपण नेमके कसे वागतो-बोलतो हे जाणून घ्या' असे या महिन्याचे तुम्हाला सांगणे आहे. मनमोकळेपणाने राहिलात तर समोरच्याचे मन जिंकणे सोपे होईल. मित्रमंडळीत थोडे सांभाळून वागा. विरोधकांवर मात करण्याचे डावपेच यशस्वी होतील.

**धनु :** आर्थिक बाजू डळमळीत होणार नाही याची खबरदारी घेऊनच खर्च करा. आमिषांना बळी पडू नका. उत्तरार्धात कार्यसिद्धी होण्यास अनुकूल असा काळ आहे. कामे मनाजोगती होतील. रक्तविकाराकडे दुर्लक्ष नको.

**मकर :** आपल्याला भेडसावत असलेल्या समस्यांचे निराकरण आपल्या एकट्याने होणे कठीण आहे हे लक्षात घेऊन मार्गक्रमण करा. ज्येष्ठांचे मार्गदर्शन उपयुक्त ठरेल. कौटुंबिक वातावरण उत्साही ठेवण्याचा प्रयत्न करा. कायद्याचे उल्लंघन टाळा.

**कुंभ :** महिन्याचा पूर्वार्ध अधिक अनुकूल असा आहे. मित्रपरिवाराकडून अपेक्षित सहकार्य लाभेल. घरातील शुभवार्तेमुळे वातावरण प्रफुल्लित राहील. उत्तरार्धात आहारावर नियंत्रण ठेवा. प्रवासात त्रास संभवतो. नवीन परिचय लाभदायक ठरतील.

**मीन :** आयुष्यात संघर्ष कोणाला चुकलाय का? थोडे सावध वागणे सध्या जरुरीचे आहे. उत्तरार्धात अनुकूलता वाढेल. कामे मार्गी लागतील. अर्थप्राप्तीचे योग संभवतात. घराचे रखडलेले प्रश्न सुटतील. मुलांच्या मागण्यांचा आलेख उंचावेल.

# जून

**मेष :** काही गोष्टी आपल्याला कर्तव्य म्हणून कराव्याच लागतात. या महिन्याच्या पूर्वार्धात तुम्हाला असाच काहीसा अनुभव येणार आहे. उत्तरार्धात मात्र आपल्या मर्जीनुसार बाबी हाताळता येतील. धनप्राप्तीचे योग संभवतात.

**वृषभ :** मध्यस्थ म्हणून काम करणाऱ्यांवर पूर्णपणे विसंबून राहू नका. तुमचे अंदाज-ठोकताळे तुम्हीच बांधा आणि त्यानुसार मार्गक्रमण करा. सरकारी नियम व कायद्याचे पालन करा. आहाराचे वेळापत्रक काटेकोरपणे पाळणे आवश्यक.

**मिथुन :** यश मिळविताना ताणतणाव तर येणारच. सध्याचा काळ थोडा तणावयुक्त जरी असला तरी तो यश पदरी पाडून देणार हे निश्चित. नातेवाइकांत शब्दाने शब्द वाढणार नाही याची खबरदारी घ्यावी.

**कर्क :** सध्या तुम्हाला मिळत असलेले यश आणि धनलाभ यामुळे उत्साह वाढेल. कौटुंबिक वातावरणही आनंदी असेल. स्थावर मालमत्तेविषयीचे प्रश्न सोडवू शकाल. सामाजिक प्रतिष्ठाही वाढेल. उत्तरार्धात थोडे सतर्क राहणे आवश्यक.

**सिंह :** या महिन्यात तुमच्या कामकाजाच्या स्वरूपात बदल होण्याची शक्यता जाणवते. अर्थलाभ बऱ्यापैकी होईल. आरोग्य आणि आहाराबाबत केलेली बेपर्वाई तुम्हालाच महागात पडू शकते. दैनंदिन कामकाजाचे वेळापत्रक पाळा.

**कन्या :** आलेल्या अपयशातून मार्ग काढण्यासाठी अधिक मेहनत आणि एकाग्रता वाढवावी लागेल. स्वकर्तृत्वावर विश्वास ठेवा, यशस्वी व्हाल. उत्तरार्धात काही अनपेक्षित घटनाक्रमांमुळे तुम्ही नाराज व्हाल. प्रतिष्ठितांचे सहकार्य लाभेल.

**तूळ :** शब्द पाळण्यात आपल्याला अडचण येणार नाही याची पूर्णपणे खात्री असेल तरच पुढे जा. तुमच्या चुकांवर बोटे ठेवायला विरोधक टपलेले आहेत हे जाणूनच मार्गक्रमण करा. मोठे आर्थिक व्यवहार नकोच.

**वृश्चिक :** आप्तेष्टांबरोबरचे मतभेद हे मनाला फार क्लेशदायक असतात. त्यांच्या चुका त्यांना सौम्य शब्दात समजावून सांगा. घरातील व्यक्तींच्या आजारपणासाठी अधिक वेळ द्यावा लागेल. कायद्याचे उल्लंघन टाळा.

**धनु :** या महिन्यात नवीन आव्हानास सामोरे जावे लागेल. जिद्दीने व चिकाटीने यश खेचून आणाल. वरिष्ठांच्या सल्ल्याने प्रलंबित कामे मार्गी लागतील. राहते घर किंवा स्थावर इस्टेट याबाबत महत्त्वाचे निर्णय घ्या.

**मकर :** या महिन्याच्या पूर्वार्धात मित्रपरिवाराकडून काही अनपेक्षित घटना घडल्यामुळे तुम्ही थोडे व्यथित होण्याची शक्यता संभवते. त्वरित प्रतिक्रिया न देणे हिताचे ठरेल. उत्तरार्धात मनाजोगती यशप्राप्ती होईल. प्रगतीचा वेग चांगला असेल.

**कुंभ :** आपल्याच कर्माने आपण कधीकधी अडचणी ओढवून घेतो. तसाच काहीसा प्रकार या महिन्यात तुम्ही अनुभवाल. मोठेपणाच्या हव्यासापोटी अनावश्यक खर्च करू नका. आपल्या कामावर लक्ष केंद्रित करा.

**मीन :** सध्या तुमच्या सत्त्वपरीक्षेचा काळ आहे. परिस्थितीनुसार वागण्या-बोलण्यात बदल करावा लागेल. पूर्वार्धात धनप्राप्तीचे काही योग संभवतात. उत्तरार्ध मात्र थोडा कसरतीचा जाईल. नोकरदार व्यक्तींनी आपली अधिकारकक्षा ओलांडू नये.

# जुलै

**मेष :** कार्यक्षेत्रात वरिष्ठांच्या मार्गदर्शनाने नवीन योजना यशस्वीपणे अमलात आणू शकाल. मित्रपरिवाराकडून अपेक्षित सहकार्य लाभेल. उत्तरार्धात थोडे अधिक सतर्क राहा. गुप्तशत्रूंना वरचढ होण्याची संधी देऊ नका.

**वृषभ :** हाती असलेल्या जबाबदाऱ्या आणि उपलब्ध वेळ यांचा योग्य मेळ घाला. समाजातील आपली प्रतिष्ठा सांभाळण्याचा प्रयत्न करा. नोकरदारांनी कामातील अचूकता जोपासावी. गुंतवणुकीचे प्रस्ताव सध्या बाजूला ठेवणेच इष्ट.

**मिथुन :** 'सर सलामत तो पगडी पचास' हे जाणून वागण्याचा हा महिना असेल. तब्येतीच्या छोट्या-मोठ्या तक्रारींकडे अजिबात दुर्लक्ष करू नका. स्वत:च्या कर्तृत्वावर अधिक विश्वास ठेवा. मित्रांत आर्थिक व्यवहार टाळा.

**कर्क :** काही अनपेक्षित आणि अप्रिय घटनांमुळे तुमचा कार्यउत्साह कमी होईल. परंतु हा प्रासंगिक बदल आहे. कालांतराने सगळे पूर्ववत होईल अशा अपेक्षेने वागा. तुमचीच सरशी होईल. प्रवास संभवतो. कौटुंबिक प्रश्न सामोपचाराने सोडवा.

**सिंह :** 'नवी विटी नवा डाव' असे या महिन्यात तुम्हाला अनुभवाला येईल. अजिबात नाराज होऊ नका. आत्मविश्वासाने सामोरे गेलात तर तुम्ही बाजी मारलीच म्हणून समजा. विचारात नकारात्मकतेला अजिबात थारा देऊ नका.

**कन्या :** या महिन्यात काही आनंददायी घटना तुमच्या आयुष्यात घडतील. प्रतिष्ठितांच्या ओळखीचा फायदा उठवू शकाल. मानसिक स्वास्थ्य उत्तम राहील. आपला नेमका आवाका ओळखूनच विरोधकांशी खेळी खेळा. कलाकारांना नव्या संधी चालून येतील.

**तूळ :** इतरांची मर्जी राखून या महिन्यात तुम्हाला मार्गक्रमण करावे लागेल असे दिसते. आपला शब्द नेहमीच पाळला जाईल या भ्रमात राहू नका. उत्तरार्धात बरीच कामे मार्गी लागतील. खर्चावर नियंत्रण आवश्यक.

**वृश्चिक :** 'प्रलोभनांपासून दूर राहा' असेच या महिन्याचे तुम्हाला सांगणे आहे. नोकरी-व्यवसाय क्षेत्रात तसेच कौटुंबिक पातळीवर तडजोडीची भूमिका स्वीकारावी लागेल. आर्थिक ओढाताण होईल. वाहन चालविताना काळजी घ्या.

**धनु :** नेमका कोण, कधी आणि कुठे उपयोगी पडेल हे सांगता येत नाही. नोकरी-व्यवसायात स्वत:च्या जबाबदाऱ्या स्वत: पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. इतरांच्या सल्ल्याने गुंतवणूक करणे टाळा. आपली मते दुसऱ्यावर लादू नका.

**मकर :** आपले वागणे आणि बोलणे मधुर ठेवलेत तर बाजी मारणे फार कठीण नसते. सध्या तुम्ही हीच भूमिका घेऊन वागा. विरोधकांत वाढ होणार नाही, हे पाहा. मित्रपरिवारातले मतभेद वाढवू न देणे तुमच्या हिताचे.

**कुंभ :** या महिन्यात काही सकारात्मक घटना घडल्याने तुम्ही उल्हसित राहणार आहात. आर्थिक पातळी मजबूत होईल. मित्रपरिवारातील वाद गांभीर्याने घेऊ नका. आपण बरे की आपले काम बरे ही भूमिका अवलंबा.

**मीन :** 'सावध तो समाधानी' हे लक्षात ठेवून वागा. आपल्याला झेपतील तेवढ्याच जबाबदाऱ्या घ्या. गैरसमजातून कौटुंबिक मतभेद वाढणार नाहीत याची काळजी घ्यावी लागेल. प्रकृतीकडे अजिबात दुर्लक्ष नको. पित्तविकार संभवतात.

# ऑगस्ट

**मेष :** 'कोणत्याही बाबतीत गाफील राहू नका' असेच या महिन्याचे तुम्हाला सांगणे आहे. यश पदरी पडण्यास प्रयत्नाची शिकस्त करावी लागेल. काहींना पित्तविकाराचा त्रास संभवतो. मित्रपरिवारात आपल्या खाजगी गोष्टींची चर्चा करू नका.

**वृषभ :** पूर्वार्धात तुमचा कार्यभाग जरी मनाजोगता होत असला तरी इतर काही बाबींमुळे मन विचलित होण्याची शक्यता संभवते. कुटुंबातील एखाद्या व्यक्तीच्या मनमानी वागण्यामुळे तुम्ही त्रासून जाल. संयम बाळगा. टोकाची भूमिका नको.

**मिथुन :** आपल्या मित्रपरिवारात आपले हितशत्रू नेमके कोण हे जाणून मार्गक्रमण करणे आवश्यक आहे. प्रलोभनाचे प्रस्ताव टाळा. अर्थप्राप्ती मनाजोगती होईल. सरकारी नियम मोडू नका. सहनशीलता ठेवावी लागेल.

**कर्क :** संघर्ष टाळलात तर बऱ्याच गोष्टी सुखकर होतील. कुठल्या वादात किती पडायचे हे नेमके ओळखून वाटचाल करावी लागेल. आप्तेष्टांकडून एखादी आनंददायी बातमी समजेल. व्यवहारात सतर्क राहा. सामाजिक क्षेत्रात तुमच्या कार्याचे कौतुक होईल.

**सिंह :** कुणाकडून किती अपेक्षा करायच्या याची जाणीव ठेवून वागण्याचा काळ आहे. चहाडखोरांपासून सावध राहा. 'आपले काम आणि आपण' हे सूत्र बाळगा. पोटाच्या तक्रारींवर त्वरित इलाज योजणे आवश्यक.

**कन्या :** नोकरी-व्यवसायात नवीन कल्पना आणि विचार आचरणात आणण्याची संधी निर्माण होईल. तुमची अपेक्षापूर्ती पूर्णत्वाने होणार नसली तरी यश पदरी पडेल. उत्तरार्धात मनाविरुद्ध काही निर्णय घ्यावे लागतील

**तूळ :** नुकत्याच मिळालेल्या यशामुळे तुमचा आत्मविश्वास बळावलेला असेल. नातेवाइकांकडून होणाऱ्या अनपेक्षित विरोधाने तुम्ही थोडे विचलित व्हाल. नोकरी-व्यवसायात कामाचा व्याप वाढेल. उत्तरार्धात एखादी नवीन जबाबदारी स्वीकारावी लागेल.

**वृश्चिक :** खोटे आरोप हे फार मनस्ताप देतात. तुम्हाला अशा परिस्थितीचा अनुभव आलाच तर संयमाने सामोरे जा. शक्य असल्यास दुर्लक्ष करा. उत्तरार्धात परिस्थितीत सुखावह बदल होईल. विरोधकांच्या कारवाया कमी होतील.

**धनु :** कुठलीही जबाबदारी स्वीकारण्याअगोदर त्याबाबत सर्वांगीण माहिती घ्या. तुमचे 'थोडेसे चुकणे' हे विरोधकांच्या हातचे आयते हत्यार होता कामा नये याची दक्षता घ्या. उत्तरार्ध प्रगतिकारक असेल. आर्थिक विवंचना कमी होतील.

**मकर :** कुटुंबात आपला शब्द अंतिम, अशी भूमिका घेणे तुम्हालाच तापदायक ठरू शकते हे जाणून वागा. समोरच्याचे म्हणणे नीट ऐकून आपली बाजू मांडलीत तर मतभेद टाळू शकाल. प्रकृतीकडे दुर्लक्ष नको.

**कुंभ :** महिन्याच्या पूर्वार्धात ग्रहमानाची साथ चांगली लाभेल. महत्त्वाची कामे मार्गी लावा. मित्रमंडळींचे सहकार्य मिळेल. धनप्राप्तीही चांगली होईल. मात्र उत्तरार्ध थोडा अधिक सतर्कतेने काढावा लागेल. प्रवासात जास्त खर्च संभवतो.

**मीन :** मित्रपरिवारात खाजगी बाबींची चर्चा करणे टाळा. पूर्वार्धात महत्त्वाची कामे हाती घेऊ नका. उत्तरार्धात विरोधकांचा पाडाव करण्यात यशस्वी होणार आहात. स्थावर मालमत्तेविषयक प्रश्न मार्गी लागतील.

# सप्टेंबर

**मेष :** या महिन्यात संयमी निर्णय व शिकस्तीचे प्रयत्न याशिवाय सफलता मिळणार नाही. नव्या योजना अमलात आणताना अनेक आव्हाने स्वीकारावी लागतील. गुंतवणूक लाभदायक ठरू शकते. कौटुंबिक जबाबदारी योग्यरीत्या पार पाडू शकाल.

**वृषभ :** मानसिक ताणाचा परिणाम तुमच्या कार्यक्षमतेवर होत नाही ना याची खबरदारी बाळगा. आकस्मिक खर्च उद्‌भवल्याने थोडी आर्थिक चणचण भासेल. अनावश्यक खर्चांना कात्री लावा. मित्रपरिवाराकडून अधिक अपेक्षा करू नये.

**मिथुन :** हाती असलेल्या पैशाची आपल्याला पुढेही आवश्यकता भासू शकते हे जाणून खर्च करा. कुटुंबातील व्यक्तींकडून आनंददायी वार्ता कानावर पडेल. उत्तरार्धात काही अनपेक्षित समस्या डोके वर काढतील.

**कर्क :** नुकताच परिचय झालेल्या व्यक्तीवर आपण किती विश्वास टाकायचा हे ठरवून वागण्याचा काळ आहे. कुठलाही मोठा आर्थिक व्यवहार करण्याअगोदर तज्ज्ञांशी सल्लामसलत केल्याशिवाय निर्णय घेऊ नका. कला-क्रीडा क्षेत्रातील व्यक्तींना नव्या संधी प्राप्त होतील.

**सिंह :** ज्याचे रागावर नियंत्रण असते तो अनेक बाबींत सुखी आणि यशस्वी होतो. सध्या तुम्ही मनावर ताबा ठेवून वागणे जरुरीचे आहे. कामानिमित्त प्रवास घडण्याची शक्यता जाणवते. मोठे व्यवहार टाळा.

**कन्या :** कुठल्या गोष्टीत आपण किती सहभाग घ्यावा हे ठरवून वागलात तर बऱ्याच विवंचनांपासून दूर राहण्यात यशस्वी व्हाल. संयम बाळगा. आरोग्याच्या तक्रारींकडे अजिबात दुर्लक्ष नको. अनावश्यक खर्च टाळा.

**तूळ :** ग्रहमानातील अनुकूल बदलाने प्रगतीचा वेग वाढेल. पूर्वार्धात अधिकारांत वाढ होईल. पदोन्नती संभवते. काहींच्या घराबाबतच्या समस्या मार्गी लागतील. उत्तरार्धात अति आत्मविश्वास घातक ठरू शकतो. व्यवसाय क्षेत्रात तडजोडीचे धोरण व्यवहार्य ठरेल.

**वृश्चिक :** तुमच्या कामकाजात इतरांना जास्त हस्तक्षेप करू देऊ नका. काही बाबी या खाजगीच राहणे हिताचे असते. नोकरी-व्यवसाय क्षेत्रात तुमची चढती कमान राहणार आहे. केलेल्या कामाचे चीज झाल्याने समाधान लाभेल.

**धनु :** दुसऱ्यावर विसंबून कोणतेही महत्त्वाचे निर्णय घेऊ नका. सध्या सुरू असलेली कामे तशीच चालू राहू द्या. उत्तरार्धात तुम्ही तुमची बाजू यशस्वीपणे मांडू शकाल. गुंतवणूक वाढवा. परिस्थितीनुसार निर्णय घेण्याचे कौशल्य विकसित करावे लागेल.

**मकर :** ग्रहमान थोडे संमिश्र स्वरूपाचे असे आहे. प्रयत्नात सातत्य ठेवा. ज्येष्ठांच्या सल्ल्याने कामे मार्गी लागतील. घरातील नाराजी दूर करण्यात तुमचा वेळ खर्ची होईल. कायदेभंग टाळा. प्रकृतीची पथ्ये सांभाळा.

**कुंभ :** सुसंवादातून अनेक महत्त्वाची कामे मार्गी लावू शकाल. आपली आर्थिक क्षमता विचारात घेऊनच दीर्घकालीन गुंतवणुकीसंबंधी निर्णय घ्या. प्रवासाचे योग संभवतात. कौटुंबिक वातावरण आनंदी असेल. महिलांनी तब्येतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नये.

**मीन :** महिना आनंददायी असा आहे. कार्यक्षेत्रात चांगल्या संधी येतील. नेमका हेतू साध्य करणे सोपे होईल. मालकी हक्काबाबतचे प्रश्न मार्गी लागतील. मतभेदाचे प्रसंग चतुराईने हाताळले तर कौटुंबिक कटुता टाळू शकाल.

# ऑक्टोबर

**मेष :** आपल्या वागण्या-बोलण्यावर बऱ्याच गोष्टी अवलंबून असतात. सध्या तुम्ही गोड बोलून आपला कार्यभाग साधा. पूर्वार्धात छोट्या कामासाठी अधिक वेळ खर्ची होईल. उत्तरार्ध यशदायी जाईल. आर्थिक व्यवहारात झालेल्या लाभाने आत्मविश्वास वाढेल.

**वृषभ :** तुमच्या मनात जे आहे ते साध्य कसे करायचे याचे आराखडे तयार ठेवा. मित्रपरिवारात शाब्दिक द्वंद्व टाळा. आर्थिक बाजूकडे दुर्लक्ष नको. उत्तरार्धात विरोधकांना नमविणे फारसे कठीण जाणार नाही.

**मिथुन :** नोकरी-व्यवसाय क्षेत्रात तसेच कौटुंबिक जीवनात काही मनाविरुद्ध घडणाऱ्या बाबींमुळे मन:स्थिती थोडी अस्थिर होण्याची शक्यता आहे. 'सुसरबाई तुझी पाठ मऊ' हे सूत्र घेऊन मार्गक्रमण करणे हितावह. प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका.

**कर्क :** तुमची आक्रमकता या महिन्यात वाढणार आहे. तुमच्या बोलण्याने विरोधक प्रभावित होतील. सरकारदरबारी कामे मार्गी लावू शकाल. आवक उत्तम राहील. गुंतवणूक वाढवा. उत्तरार्धात प्रवासात त्रास संभवतो.

**सिंह :** सध्या सुरू असलेला संघर्ष या महिन्याच्या पूर्वार्धात सुरूच राहील. उत्तरार्धात तुम्हाला यश मिळण्यास सुरुवात होईल. कामानिमित्त प्रवास संभवतो. कुटुंबातील व्यक्तीकडून आनंददायी वार्ता कानी पडेल.

**कन्या :** या महिन्यात इतर काही व्यापात गुंतून राहिल्याने आपल्या प्राकृतिक स्वास्थ्याकडे दुर्लक्ष तर होत नाही याचे भान राखणे महत्त्वाचे आहे. आर्थिक चढ-उतार लक्षात घेऊन कर्तव्यपूर्तीसाठी काही कठोर निर्णय घ्यावे लागतील. मोठ्या प्रलोभनाची गुंतवणूक टाळा.

**तूळ :** 'सामंजस्याने निर्णय घ्या' असेच या महिन्याचे तुम्हाला सांगणे आहे. आवश्यक तेवढाच खर्च करा. मित्रमंडळीत वाद टाळा. कौटुंबिक सलोख्यासाठी थोडी तडजोड करावी लागेल. कार्यक्षेत्रात वेळेला महत्त्व द्या

**वृश्चिक :** आत्मविश्वास वृद्धिंगत करणारा असा काळ आहे. समाजातील आपल्या ओळखीचा फायदा करून घ्या. काहींच्या घरात शुभकार्ये घडतील. भावंडांशी असलेले वाद चिघळू न देणे तुमच्याच हिताचे ठरेल.

**धनु :** या महिन्यात तुमचे कर्तृत्व आणि ग्रहमानाची अनुकूलता यांचा उत्तम मेळ बसणार आहे. मनसुबे प्रत्यक्षात आणण्यास अनुकूल काळ आहे. प्रलोभनाने विचलित होऊ नका. जवळच्यांचा क्रोध जाणून घेऊन आपल्या वागण्या-बोलण्यात बदल करा.

**मकर :** आपण अडचणीत असलो तर प्रसंगी इतरांकडून मदत ही घेतलीच पाहिजे. सध्या शांत बसून चालणार नाही. व्यावहारिक दृष्टिकोन बाळगा. संवादाने प्रश्न सुटतात हे विसरू नका. उत्तरार्धात तुमचे पारडे थोडे जड होईल.

**कुंभ :** विरोधकांना संधी मिळेल असे कुठलेही कृत्य तुमच्या हातून होणार नाही याची काळजी घ्या. आर्थिक उलाढालीस योग्य दिशा मिळेल. प्रतिष्ठित व्यक्तींचा सहवास मन सुखावणारा ठरेल. धार्मिक कार्यात सहभागी व्हाल.

**मीन :** घरातील मतभेद हे फार त्रासदायक असतात. ते टाळाच. पूर्वार्धात आर्थिक आवक चांगली राहील. सरकारी कायदे-कानून, नियम यांची चौकट मोडू नका. जबाबदारीने वागा. काही अनपेक्षित खर्च करावा लागेल.

# नोव्हेंबर

**मेष :** कार्यक्षेत्रातील नियोजित कामांना गती मिळेल. कुटुंबात सहकार्याची भूमिका घ्या. मित्रपरिवारात आपलेच म्हणणे खरे करण्याचा अट्टाहास करू नका. आर्थिक उधारी-उसनवारी करणे टाळा. प्रवासात पथ्यपाणी सांभाळा.

**वृषभ :** पूर्वार्धात छोट्या कामाला मोठी ताकद खर्ची घालावी लागेल. परंतु यश पदरी पडेल. आर्थिक लाभ चांगला असेल. समाजातील मानमरातबही वाढलेला जाणवेल. उत्तरार्धात आप्तेष्टांसोबतचे संवाद काळजीपूर्वक करा. वादातीत विषयावर सर्वांगीण विचार करूनच आपले मत मांडा.

**मिथुन :** सध्या तुम्ही विचारपूर्वक पावले उचलणे आवश्यक आहे. तुम्हाला जे पटणार नाही त्या बाबतीत तुमची भूमिका ठामपणे मांडा, परंतु गोड बोलून. उत्तरार्धात अनुकूलता वाढेल. आर्थिक नियोजन यशस्वी होईल. काहींना पित्तविकारांपासून त्रास संभवतो.

**कर्क :** मानसिक ताणतणावाचे परिणाम प्रकृतीवर होऊ देऊ नका. एकाग्रता वाढवा. कार्यक्षेत्रातील आपल्या मर्यादा जाणून घ्या. प्रामाणिकपणे केलेल्या कामाचे फळ मिळेल. ज्येष्ठ व्यक्तींनी आवडीच्या कामात मन रमवावे.

**सिंह :** महिन्याच्या पूर्वार्धात तुमच्या अंगी असलेले कर्तृत्वगुण दाखवायला अनुकूल असे ग्रहमान आहे. सरकारी कामकाजात अपेक्षित प्रगती साधू शकाल. तातडीच्या निकालासाठी आग्रही राहू नका. थोडी वाट पाहा. अति लाभाची गुंतवणूक करू नका.

**कन्या :** आपल्या वागण्या-बोलण्याने कोणी दुखावला तर जात नाही ना याची काळजी घ्या. नुकत्याच ओळख झालेल्या व्यक्तीवर पूर्णपणे विश्वास दाखवू नका. उत्तरार्धात तुमच्या यशाची कमान चढती असेल. मिळालेल्या आर्थिक लाभाची बचतीत गुंतवणूक करा.

**तूळ :** नोकरी-व्यवसायातील महत्त्वाची कामे वरिष्ठांच्या सल्ल्याने मार्गी लावा. आर्थिक व्यवहारात लेखी करार आवश्यक आहे. अव्यवहार्य धाडस करू नका. प्रवासात अनावश्यक खर्च करावा लागेल. आहारावर नियंत्रण आवश्यक.

**वृश्चिक :** आपल्या मनाप्रमाणे प्रत्येक गोष्ट घडेलच असे नाही हे ध्यानी ठेवून मार्गक्रमण केलेत तर मार्ग सुखकर होतील. वाढीव खर्चावर अंकुश आणा, अन्यथा आर्थिक चणचण भासेल. आरोग्याविषयी बेपर्वाई नको. उत्तरार्धात कुटुंबात काही आनंदाचे क्षण अनुभवता येतील.

**धनु :** आपली नेमकी अडचण जाणून घेतलीत तर यश लवकर पदरी पडेल. आप्तेष्टांचे मन सांभाळलेत तर बऱ्याच बाबी सुकर होतील. वरिष्ठांचे सहकार्य लाभेल. खर्चाचा नेमका अंदाज घेऊन प्रवासाचे नियोजन करा. नोकरदारांनी आपल्या कामातील अचूकता जोपासावी.

**मकर :** मनाजोगती कामे करायला मिळाल्याने तुम्ही या महिन्यात सुखावून जाणार आहात. पूर्वार्धात धनप्राप्ती चांगली होईल. काहींना बढती-बदलीचे योग संभवतात. प्राकृतिक स्वास्थ्यासाठी आहार-विहाराचे वेळापत्रक चुकवू नका.

**कुंभ :** प्रत्येक वेळी तुमच्या अपेक्षेनुसारच कामे होतील असे नाही. नाराज होऊन जाऊ नका. उत्तरार्धात परिस्थिती बदलेल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. अति आत्मविश्वास घातकी ठरू शकतो हे लक्षात ठेवा. विरोधकांना त्यांची जागा दाखवून द्याल.

**मीन :** ताणतणाव हे प्रत्येकाला असतात. तुमच्या विवंचनांची चर्चा इतरांकडे करू नका. अनोळखी व्यक्तींशी पैशाचे व्यवहार टाळाच. भागीदारीत आर्थिक व्यवहारातील पारदर्शकता आवश्यक. महिलांनी घडून गेलेल्या घटनांवर विचार करणे टाळावे.

# डिसेंबर

**मेष :** काहीतरी वेगळे करायचे म्हणून उगाच चुकीच्या मार्गाचा अवलंब करू नका. पैसा आणि शक्ती यांचा अपव्यय होईल. वरिष्ठांकडून मिळालेल्या सूचनांचे योग्य पालन करा. आवश्यक तेवढाच खर्च करा. मन:शांती आवश्यक आहे.

**वृषभ :** आपले म्हणणे दुसऱ्याच्या गळी उतरविण्याच्या नादात तुम्ही तुमच्या ध्येयापासून विचलित तर होत नाही आहात ना याची खबरदारी बाळगा. मतभेदाचे प्रसंग खुबीने गोड बोलून हाताळा. प्रवासात मौल्यवान वस्तू सांभाळा.

**मिथुन :** यशाचा आलेख चढता असल्याने उत्साह वाढून कामाचा वेग वाढेल. अर्थप्राप्ती चांगली असेल. कामाच्या व्यापात स्वत:कडे अजिबात दुर्लक्ष नको. श्वासाचे त्रास जाणवले तर त्वरित इलाज योजा. काटकसरीचे अर्थनियोजन आवश्यक आहे.

**कर्क :** तुम्ही तुमच्या विचारात स्पष्टता आणा. वादग्रस्त कार्यात सहभागी होऊ नका. प्रत्येक पाऊल संयमाने टाकावे लागेल. मौजमजेवर पैसा खर्च करताना हात आखडता घ्या. सामाजिक क्षेत्रात वावरताना प्रतिष्ठेचा प्रश्न करू नका.

**सिंह :** प्रगतीचा मार्ग स्वीकारून वाटचाल करावी लागेल. अतिरेक हा हानिकारकच असतो. कौटुंबिक जबाबदारीचे भान ठेवा. कामानिमित्त प्रवासाचे योग संभवतात. जमिनीचे प्रश्न डोके वर काढण्याची शक्यता आहे. तब्येतीकडे दुर्लक्ष नको.

**कन्या :** जिथे आपल्याला किंमत नाही तिथे आपण जायचेच कशाला ? प्रतिष्ठा सांभाळा. कार्यक्षेत्रातील आपल्या अधिकाराची सीमारेषा ओलांडू नका. नोकरी-व्यवसाय क्षेत्रात छोट्याशा चुकीमुळे त्रास होऊ शकतो. मानसिक संतुलन आवश्यक आहे. कामातील एकाग्रता वाढवा.

**तूळ :** सध्या तुमचे हितचिंतक कोण हे जाणून घ्या. तुमची मते मांडताना उगाचच स्पष्टवक्तेपणा नको. उत्तरार्धात आप्तस्वकीयांकडून अपेक्षित सहकार्य लाभेल. धनप्राप्ती होईल. आकर्षक आर्थिक प्रस्ताव समोर येतील, त्यावर विचारपूर्वक निर्णय घ्या.

**वृश्चिक :** कुटुंबातील वातावरण आनंदी कसे राहील हे पाहा. वाद वाढवू नका. नातेवाइकांत व्यवहार टाळावा. विरोधकांच्या वाढत्या कारवायांमुळे सतर्कतेने मार्गक्रमण करावे लागेल. काहींना डोळ्यांचे त्रास संभवतात. फसव्या आश्वासनांपासून लांब राहा.

**धनु :** आपल्या हाती असलेल्या अधिकारांचा आवश्यक तेव्हाच वापर करा. नोकरी-व्यवसाय क्षेत्रात तपशीलवार माहिती घेतल्याशिवाय निर्णय घेऊ नका. कौटुंबिक समस्या सोडवितांना ज्येष्ठांच्या मताला प्राधान्य द्या. पोटाच्या तक्रारींकडे दुर्लक्ष नको.

**मकर :** सध्या तुम्ही हाती घेतलेली कामे पार पाडण्यात अडचण येणार नाही. थोरामोठ्यांचा सल्ला योग्य मार्ग दाखवेल. उत्तरार्धात काही अनपेक्षित अडचणी संभवतात. तडकाफडकी निर्णय घेऊ नका. सामाजिक क्षेत्रात जबाबदारीने वागावे लागेल.

**कुंभ :** ग्रहमान अनुकूल आहे. महत्त्वाचे प्रश्न मार्गी लागतील. नवीन जबाबदारी स्वीकारावी लागेल. कुटुंबातील काही व्यक्तींच्या विरोधाला तुम्हाला सामोरे जावे लागेल. विचलित न होता वाटचाल चालू ठेवा. वडीलधाऱ्यांचा मान राखा.

**मीन :** या महिन्यात धनप्राप्ती मनाजोगती असेल. मात्र काही खर्च अचानकपणे सामोरे ठाकतील. मोठे व्यवहार पुढे ढकला. उत्तरार्ध आनंददायी असेल. कुटुंबात प्रसन्नतेचे वातावरण राहील. आवडत्या व्यक्तींचा सहवास लाभेल. मेजवानीचे योग संभवतात.